प्रेसनोट दि. ०६/०८/२०१८

# फिर्यादी यांचे फेसबुक अकांउटवर अश्लिल फोटो व मेसेजेस पाठविण्या-या आरोपीस सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांनी ताब्यात घेतले

पुणे शहरातील ७८४ कसबापेठ केसीर्सी क्लास जवळ यंजना हॉटेलच्या मागे पुणे या भागात राहाणा-या महीला तक्रारदार यांनी सायबर क्राईम सेल,पुणे शहर यांचेकडे त्यांच्या नावाचे फेसबुक अकाऊंट आहे त्यावर कोणतरी अज्ञात इसमाकडून अश्लिल व घाणेरडे फोटो,मेसेजे पोस्ट केले आहेत याबाबत तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता. अधिक चौकशीअंती गैरअर्जदार अनिकेत आत्माराम डोंगरे रा- १४७५ कसबापेठ पंडीतवाडा पुणे शहर बालाजी मंदीराशेजारी पुणे-४११०११. याने सदरचा प्रकार केल्याचे निष्पन्न झाले त्यास ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याने **Mady Disuza या नावाने फेक फेसबुक अकाउंट तयार करून अर्जदार यांचे फेसबुक अकाउंटवर अश्लिल फोटो व मेसेजेस पाठवित होता अर्जदार यांनी पोलीसमध्ये तक्रार करण्याचे सांगुनही गैरअर्जदार नामे** अनिकेत आत्माराम डोंगरे हा अर्जदार यांना **अश्लिल फोटो व मेसेजेस पाठवित असल्याचे निष्पन्न झाले आहे**. अर्जातील तक्रारीची दखल घेवून वर नमूद आरोपीस त्याने तक्रारदार मुलीची बदनामी करण्यासाठी वापरत असलेला आयडीया कंपनीचे सिमकार्ड व मोबाईल सह ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई करणेकामी त्यास फरासखाना पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.तसेच तक्रारदार मुलीला संबांधीत पोलीस स्टेशन ला जावून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. सदरची कामगिरी ही पोलीस उप-आयुक्त ज्योतीप्रिया सिंह, सहा.पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि रुपाली पवार व कर्मचारी मपोशि माधुरी डोके, पो.शि किरण अबदागिरे., पोशि अनुप पंडीत, पो शि.आदेश चलवादी या पथकाने कारवाई केली आहे.